# राज्य निवडणूक आयोग

क्र. रानिआ-१०९६/प्र.क्र. २/९६/पंरा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ९ जानेवारी १९९६

## परिपत्रक

**विषय :** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५ (१अ) नुसार ग्रामपंचायती विघटित करणेबाबत

भारताच्या संविधानात ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्या घटना दुरुस्तीनुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सुधारित मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५ (१अ) च्या तरतुदीनुसार निम्म्यापेक्षा जास्त सदस्य पदे रिक्त झाल्यास राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून ग्रामपंचायती विघटित करण्याची तरतूद आहे.

२. संविधानाच्या अनुच्छेद २४३ एन् मधील परंतुकानुसार ७३ व्या घटना दुरुस्तीपूर्वी अस्तित्वात असलेल्या पंचायती त्यांच्या मुदती पूर्ण होईपावेतो अस्तित्वात राहतील. अशी तरतूद आहे. दिनांक २३ एप्रिल १९९४ रोजी उपरोक्त घटना दुरुस्ती व त्या अनुषंगाने केलेले सुधारित कायदे अस्तित्वात आलेले आहेत.

३. दिनांक २३ एप्रिल १९९४ नंतर निवडणूका झालेली ग्रामपंचायत विघटित करण्याचे अधिकार उपरोक्त परिच्छेद-१ मधील तरतूदीनुसार शासनाला आहेत व त्यानुसार विघटित झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका विधानाच्या अनुच्छेद २४३ चे उपकलम (३) नुसार सहा महिन्यांच्या आत घेणे सक्तीचे (Mandatory) आहे.

४. वर नमुद केलेल्या परिस्थितीमध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५(१अ) नुसार विघटित ग्रामपंचायतीचे आदेश **राजपत्रात प्रसिद्ध झाल्यावर सदर राजपत्रित आदेशाची प्रत राज्य निवडणूक आयोगाला त्वरीत मिळण्याची व्यवस्था खात्रीपूर्वक करण्यात यावी.** विघटनाचा आदेश राजपत्रात प्रसिद्ध झाल्याशिवाय ग्रामपंचायतीचे विघटन झाले असे समजता येणार नाही आणि त्यानुसार विघटनाचा आदेश राजपत्रात ज्या तारखेस प्रसिद्ध झाला आहे त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेणे बंधनकारक असल्यामुळे राजपत्रित आदेशाची प्रत राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झाल्याशिवाय निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करून निवडणूक प्रक्रिया वरीलप्रमाणे सहा महिन्याच्या अवधीत पूर्ण करता येणे शक्य होणार नाही.

५. ह्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याकडून कोणतीही हयगय झाल्यास व त्यामुळे मुदतीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करता येणे शक्य न झाल्यास त्याविषयाची सदर अधिकाऱ्याची राहील, याची विशेष नोंद घ्यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार
**(दे. ना. चौधरी)**
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग.
महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.